भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १३८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०२/२०१७

**१) महीलेस अश्लिल शब्दात बोलुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १४/०२/२०१७ वा.०८.०० ते दि. २३/०२/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील फिर्यादी ही घरी एकटीच हजर असतांना तीचे घरी जावुन यातील आरोपीने तीला मामी आंघोळ झाली का तुम्ही पावडर लावल्याने चांगले दिसता असे बोलुन फिर्यादीने उजव्या हाताचा मनगट पकडुन विनयभंग केला व तु माझे काय करशील अशी धमकी दिल्याने फिर्यादीचे तोडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३५४,४५२,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सारवे पोस्टे लाखनी हे करीत आहेत.

**२) एन.एच.०६ रोडवर उभा असलेला ट्रकला मोटार सायकल चालकाने धडक देवुन त्याचे व आपले मरणास तसेच एकास जखमी कारण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २४/०२/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान यातील आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक वाहतुकीस अडथळा निर्मान होईल अशा रितीने हायवे रोडवर ट्रक उभा केला त्यामुळे यातील मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ एस. ८०१७ चा चालक मृतक धनराज राजीराम बावनकर वय ४५ वर्ष रा. लाखनी याने स्वता: चे ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन ट्रक चे मागे उभा असलेला दिवानजी कयुब शेख यास धडक देवुन त्याचे मोटार सायकल वर मागे बसलेला जखमी आकाश बावनकर चे सोबत मोटार सायकल सह ट्रकचे आत घुसले त्यामुळे मोटार सायकल चालक धनराज राजीराम बावनकर वय ४५ वर्ष रा. लाखनी व उभा असलेला दिवानजी कयुब गफुर शेख वय ६२ वर्ष रा. लाखनी हे मरण पावले व मोटार सायकलवर बसलेला ईसम गंभीर जखमी झाला यातील आरोपी ट्रक चालक याने ट्रकला एन.एच. ०६ रोडवर उभा करून वाहतुकीस अडथळा केला त्यामुळे मोटार सायकल चालक हा स्वता: व दिवानजी यांचे मरणास कारणीभुत झाला असुन ट्रक चालक सुध्दा दोघांचे मरणास कारणीभुत आहे व मोटार सायकलवर मागे बसलेल्या इसमास गंभीर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने स्टे.डा. सान्हा.क्र. २३/२०१७ दि.२४/०२/२०१७ चौकशी व फिर्यादी मनोज सोमाजी मोहनकर वय ३७ वर्ष रा लाखनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८३,२७९,३३८,३०४(अ) भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कुरील पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**३) संगनमत करुन जुन्या भांडणावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारपीट केली व जिवाने मारण्याची धमकी देवुन महीलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २३/०२/२०१७ चे १८.०० ते २४/०२/२०१७ चे ०८.०० वा. पर्यत यातील तीनही आरोपीतांनी संगनमत करुन जुन्या भांडणावरुन फिर्यादी व तिच्या बहीनीला लज्जेस धोक पोहचेल अश्या अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन हाता बुक्यांनी मारपीट केल्याने व विनयभंग करुन रस्त्यात अडवुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३४१,५०९,२९४,५०६,३२३,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

४) घराच्या समोरील दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करुन घरातील सोन्याचे सामन, कॅमेरा व नगदी पैश्याची चोरी . :–

दिनांक २४/०२/२०१७ चे १२.०० ते १९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी किशोर हरीदास लांजेवार वय २६ वर्ष, रा. सुयोग नगर राजेदहेगाव हा आपल्या आई सोबत बहीनीचे गावी आंधळगाव येथे वाढदिवसाचे कार्यक्रमाला गेला असता यातील अज्ञात आरोपीने सुना मौका पाहुण फिर्यादीचे घराचे समोरील दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन बेड रुम मधील लोखंडी गोदरेज आलमारीचा लॉकर तोडुन त्यात ठेवलेला १ सोन्याचा गोप १७.५ ग्रॅम, सोन्याचे कर्णफुल ७.५ ग्रॅम, सोन्याचे रिंग ३.५ ग्रॅम, सोन्याची नथ ३.५ ग्रॅम, सोन्याची अंगठी ३ ग्रॅम, कोडयाक कंपनीचा कॅमेरा व नगदी ३,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५४,३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पोलीस स्टेशन जाहरनगर हे करीत आहेत.

५) अवैध दारु अडयांवर धाडी . :–

दिनांक २४/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. तुमसर येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण १ गुन्हा दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी दारु किंमती १,०००/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

पो.नी. बि. आर. गाडे
जि. वि. शा भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.